ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - I

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prof. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

TRUE COPY
Principal,
Rajarshi Chh. Shahu College
Kolhapur

TRUE COPY
Principal,
Rajarshi Chh. Shahu College
Kolhapur

# १८. स्त्री शेतमजुरांचा विकास : सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने वाटचाल

**प्रा. डॉ. देसाई एस. बी.**
सहयोगी प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.
**प्रा. डॉ. कुलकर्णी एस. आर.**
सहाय्यक प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.

**गोषवारा**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे. शेतीचा विकास झाला तरच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास होतो. भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वसमावेशक विकासासाठी लोकसंख्येत ५० टक्के सहभाग असलेल्या स्त्रियांचा विकास होणे आवश्यक आहे. प्रस्तुत अभ्यास विषयामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात महिला शेतमजुरांची सद्यस्थिती व त्यांच्या समस्या कोणत्या आहेत हे जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. शासनामार्फत संघटित व असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या वेतन निश्चितीसाठी, कामाच्या सुरक्षिततेसाठी अनेक कायदे करण्यात आले आहेत.परंतु या कायद्यांची अंमलबजावणी योग्य रीतीने होत नाही.

**पारिभाषिक शब्द:** स्त्री शेतमजूर, सर्वसमावेशक विकास, किमान वेतन कायदा ई.

**प्रस्तावना**

ग्रामीण अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषी प्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारतात जवळ जवळ ७०% भाग ग्रामीण असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहे.आजही जवळ जवळ ६०% लोकांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे.शेतीचे वैशिष्ट्य म्हणजे शेती हे एकमेव असे क्षेत्र आहे की जेथे श्रम दलात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया काम करीत आहेत. एवढेच नाही तर शेतीची कामे पुरुषांच्या तुलनेने स्त्रिया मोठ्या संख्येने करतात. तरीही एकाच कामासाठी स्त्री–पुरुषांच्या वेतनात फरक केला जातो. ज्या स्त्रीने शेतीचा शोध लावून भटक्या अवस्थेत जगणाऱ्या मानवाला स्थिर केले तीच स्त्री या क्षेत्रात उपेक्षित आहे. तिला गौण स्थान दिले जाते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वसमावेशक विकासासाठी लोकसंख्येत ५० सहभाग असलेल्या स्त्रियांचा विकास होणे आवश्यक आहे.

**समस्या निवड**


स्त्रियांमध्ये मुळातच निर्मितीक्षमतेचा गुण आहे.अन्नधान्य निर्मितीत पुरुषांच्या तुलनेने स्त्रिया जास्त काम करतात. स्त्रिया मध्ये असलेले वेगवेगळे गुण सहनशीलता, काटकसरीपणा, अपार प्रेम यामुळे त्या पिकांची योग्य निगा राखू शकतात. परंतु स्त्री शेतमजूर हा घटक विकासाच्या दृष्टीने अद्यापही वंचित आहे. प्रस्तुत अभ्यास विषयामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात महिला शेतमजुरांची सद्यस्थिती व त्यांच्या समस्या कोणत्या आहेत हे जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे**

1. भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्री शेतमजुरांचा अभ्यास करणे
2. स्त्री शेतमजुरांच्या समस्या जाणून घेणे.

आलेख क्र.१.१.

वेतनातील लैंगिक विषमता



स्त्रोतः https:// www.downtoearth.org.in.dt

**ब. स्त्री शेतमजुरांची वयोगटानुसार विभागणी**

तक्ता क्र. १.२ मध्ये स्त्री शेतमजुरांची वयोगटानुसार विभागणी दर्शविली आहे

तक्ता क्र. १.२.


स्त्री शेतमजुरांची वयोगटानुसार विभागणी

| अ.न | वय (वर्षे) | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | २० ते ३० | ४ |
| २ | ३१ ते ४० | ३२ |
| ३ | ४१ ते ५० | ३८ |
| ४ | ५० पेक्षा जास्त | २६ |
| | एकूण | १०० |

स्त्रोतः प्रश्नावलीद्वारे

आलेख क्र. १.२.

स्त्री शेतमजुरांची वयोगटानुसार विभागणी (%)



VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

3. भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्री शेतमजूरांच्या समस्येवर उपाययोजना सुचविणे.

**गृहितके**

1. शून्य गृहितक – स्त्री शेत मजुरांना वर्षात सरासरी ९ महिने काम मिळत नाही. पर्यायी गृहितक – स्त्री शेत मजुरांना वर्षात सरासरी ९ महिने काम मिळते.
2. शून्य गृहितक – स्त्री व पुरुष शेतमजुरांना समान कामाला समान मजुरी दिली जात नाही. पर्यायी गृहितक – स्त्री व पुरुष शेतमजुरांना समान कामाला समान मजुरी दिली जाते.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत अभ्यास विषयासाठी प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे.प्राथमिक सामग्रीसाठी प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण व दुय्यम सामग्रीसाठी विविध पुस्तके, मासिके, इंटरनेट वृत्तपत्रे इ.चा वापर केला आहे. प्रस्तुत आधारा विषयासाठी संशोधकाने रुकडी, इंगळी व पट्टणकडोली या ३ गावातील ५० उत्तरदात्यांची हेतुपुरस्सर नमुना निवड पद्धतीने प्रश्नावली द्वारे माहिती संकलित केली आहे. तथ्य व गृहितक तपासणीसाठी सरासरी, शेकडेवारी व सांख्यिकीय तंत्राचा व, टेबलचा वापर केला आहे.

**विषयविवेचन**

**अ. स्त्री व पुरुष शेतमजूर यांच्या वेतनातील तौलनिक विषमता**

समान वेतन कायद्या नुसार एकाच कामासाठी स्त्री–पुरुषांना समान वेतन देण्यात यावे असा नियम आहे.परंतु शेती क्षेत्र असे क्षेत्र आहे की, जेथे एकाच कामासाठी स्त्री–पुरुषांना वेगवेगळे वेतन दिले जाते. हे खालील तक्त्या वरून दिसून येते. तक्ता क्र. १.१


**वेतनातील तौलनिक विषमता (रु)**

| वर्षे | पुरुष (रु) | स्त्रिया (रु) |
|---|---|---|
| २००६–०७ | ६२ | ५२ |
| २००७–०८ | ६५ | ५७ |
| २००९–१० | १०८ | ६२ |
| २०१०–११ | १२३ | ८७ |
| २०१२–१३ | १६३ | १३४ |
| २०१३–१४ | २३६ | २०६ |
| २०१४–१५ | २५८ | २०० |
| २०१६–१७ | २६९ | २१८ |

स्त्रोत:https:// www.downtoearth.org.in.dt

| | |
|---|---|
| ११ ते १५ | १८ |
| १५ पेक्षा जास्त | २२ |
| एकूण | १०० |

स्त्रोत: प्रश्नावलीद्वारे




वरील तक्ता क्र. १.३ आणि आलेख १.३ या वरून असे दिसून येते की स्त्री शेतमजूर म्हणून कामाचा १ ते ५ वर्षांचा अनुभव असणाऱ्यांचे सर्वाधिक प्रमाण ३८असून ११ ते १५ वर्ष कामाचा अनुभव असणाऱ्या स्त्री शेत मजुराचे सर्वात कमी प्रमाण १८ दिसून आले

### इ. स्त्री शेतमजुरांचे वर्षातील कामाचे महिने

खालील तक्ता क्र १.४ मध्ये स्त्री शेत मजुरांना सरासरी वर्षातील किती महिने काम मिळते हे दर्शविले आहे

तक्ता क्र. १.४

**स्त्री शेतमजुरांचे वर्षातील कामाचे महिने**

| वर्षातील कामाचे महिने | (%) |
|---|---|
| १ ते ३ | १२ |
| ४ ते ६ | २८ |
| ७ ते ९ | ४२ |
| ९ पेक्षा जास्त | १८ |
| एकूण | १०० |

स्त्रोत: प्रश्नावलीद्वारे

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

वरील तक्ता क्र.१२ व आलेख क्र.१२ वरून असे दिसून येते की, 50 %पेक्षा जास्त वय असणाऱ्या स्त्री शे मजुरांचे प्रमाण सर्वाधिक जास्त 38 % असून २० ते ३० वयोगटातील स्त्री शेत मजुरांचे प्रमाण सर्वात कमी १% आहे

### क. स्त्री शेतमजुरांच्या मजुरीनुसार विभागणी

स्त्री शेतमजुरांना सर्वसाधारणपणे किती मजुरी दिली जाते याची माहिती खालील तक्ता क्र. १३ आ आलेख क्र.१३ मध्ये स्पष्ट केले आहे.


**तक्ता क्र.१३.**

**स्त्री शेतमजुरांच्या मजुरीनुसार विभागणी**

| अ.न. | मजुरी (रु) | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | १०० ते १५० | १५ |
| २ | १५१ ते २०० | ६३ |
| ३ | २०१ ते २५० | १ |
| ४ | २५१ पेक्षा जास्त | २ |
| ५ | एकूण | १०० |

स्त्रोतः प्रश्नावलीद्वारे

वरील तक्ता क्र.१३ व आलेख क्र.१३ वरून असे दिसून येते की, दिवसाला ते २०० रु मजुरी मिळणाऱ्या स्त्री शेत मजुरांचे सर्वाधिक प्रमाण ६३% आहे तर 251पेक्षा जास्त मजुरी असणाऱ्या स्त्री शेतमजुरांचे प्रमाण सर्वात कमी २% आहे




### ड.कामाच्या अनुभवानुसार विभागणी

खालील तक्ता क्र.१४ मध्ये स्त्री शेत मजुरांच्या कामाच्या अनुभवानुसार त्याची विभागणी दर्शविली आहे


**तक्ता क्र.१४ .**

**कामाच्या अनुभवानुसार विभागणी**

| स्त्री शेतमजूर म्हणून कामाचा अनुभव (वर्षे) | टक्केवारी |
|---|---|
| १ ते ५ | ३६ |
| ६ ते १० | २२ |

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

### आलेख क्र. १.४
### स्त्री शेतमजुरांचे वर्षातील कामाचे महिने




वरील सारणी क्र. १४ व आलेख क्र.१४ वरून असे दिसून येते की, स्त्री शेत मजुरांना वर्षातील ७ ते ९ महिने काम मिळणाऱ्यांचे सर्वाधिक प्रमाण ४२ असून वर्षातील १०ते१२महिने काम असणाऱ्या स्त्री शेत मजुरांचे प्रमाण सर्वात कमी १२ आहे

**गृहितक पडताळणी**

**गृहितक क्र.१**

१. शून्य गृहितक – स्त्री शेतमजुरांना वर्षात सरासरी ९ महिने काम मिळत नाही

पर्यायी गृहितक – स्त्री शेतमजुरांना वर्षात सरासरी ९ महिने काम मिळते

वरील गृहितक तपासणीसाठी Z टेस्ट चा वापर केला आहे.

Z टेस्ट चे Calculated value ६.५४ व table value १.९६ आली. Calculated value ही table value पेक्षा जास्त आल्याने शून्य गृहितक नाकारले व पर्यायी गृहितक स्वीकारले. म्हणजेच स्त्री शेतमजुरांना वर्षात सरासरी ९ महिने काम मिळते

**गृहितक क्र.२**

२ शून्य गृहितक – स्त्री व पुरुष शेतमजुरांना समान कामाला समान मजुरी दिली जात नाही.

पर्यायी गृहितक – स्त्री व पुरुष शेतमजुरांना समान कामाला समान मजुरी दिली जाते.

सारणी क्र. १.५ वरून असे दिसून येते की, स्त्री व पुरुषांना समान कामाला समान मजुरी दिली जात नाही म्हणून गृहितक क्र.२ चे शून्य गृहितक स्वीकारले आहे व पर्यायी गृहितक नाकारले आहे.

**शेतमजूर स्त्रियांच्या समस्या**

भारतीय अर्थव्यवस्थेत स्त्री शेतमजुरांना पुढील समस्या भेडसावतात.

1. वेतन कमी
2. कामाचे हंगामी स्वरूप
3. कामाच्या ठिकाणी असुरक्षित वातावरण
4. कष्टप्रद काम
5. असंघटितपणा व अज्ञान
6. भविष्यकाळाची तरतूद नाही
7. हीन दर्जा

८ राहणीमानाचा निम्न दर्जा

## निष्कर्ष

स्त्री शेतमजुरांच्या अभ्यासावरून खालील निष्कर्ष काढता येतील

1 स्त्री व पुरुष शेत मजुरांच्या मजुरी मध्ये तफावत दिसून येते

2 सरासरी ६ वर्षा पर्यंत कामाचा अनुभव असणाऱ्या ३८ [illegible] स्त्रियांना २०० रु पर्यंत मजुरी मिळत असल्याचे दिसून येते.

3 ४२% स्त्रियांना वर्षातील केवळ ६ महिनेच रोजगार मिळतो

4 ३४% स्त्रिया ६० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील दिसून येतात

5 स्त्री शेत मजुरांच्या कामाच्या ठिकाणी केवळ पिण्याच्या पाण्याची सुविधा दिसून आली. स्वच्छता गृह व इतर सुविधांचा अभाव दिसून येतो.

## शेतमजूर स्त्रियाच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय

स्त्री शेत मजुरांच्या समस्याचा अभ्यास केला असता पुढील महत्वाचे उपाय सुचविता येतील

### उपाययोजना

1. किमान वेतन कायदा आणि समान वेतन कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.
2. महिला शेतमजूरासाठी विशेष कायद्याची अंमलबजावणी करावी.
3. लघु उद्योग, कुटिरोद्योगाला चालना द्यावी
4. कामाच्या ठिकाणच्या अपघाताचा, आजाराचा खर्च शेतमालकाने करावा
5. सामाजिक सुरक्षिततेच्या योजना अधिक व्यापक कराव्यात
6. कामाच्या ठिकाणची सुरक्षित वातावरण असावे

## समारोप

शेतमजूर स्त्रियाच्या समस्याचा विचार करून वरील उपायांचा अवलंब केल्यास शेतमजूर स्त्रिया समान काम करतील व त्यामुळे शेतीच्या उत्पादकतेमध्ये वाढ होण्यास मदत होऊन सर्वसमावेशक विकास साध्य होण्यास मदत होईल.

## संदर्भ सूची

1 अर्थसंवाद, जानेवारी–मार्च २०१९.

2 भारतीय अर्थव्यवस्था, प्रा.के.एम.भोसले,डॉ.ए.स.एम.भोसले,डॉ.पी.एस.कदम फडके प्रकाशन, कोल्हापूर जानेवारी २०१९.

3 व्यावसायिक पर्यावरण, भोसले, काटे फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून २०१८

4 https // www.downtoearth.org.in.dt

5 https// mpraubuni-muenchen.deMPRdt 2 2 2019

TRUE COPY

TRUE COPY

Principal,
Rajarshi Ch. Shahu College
Kolhapur

Principal,
Rajarshi Ch. Shahu College
Kolhapur